प्रेसनोट दिनांक १३/०२/२०१९

# सोलापूर ग्रामीण पोलीस दलात १४ ibike (इन्वेस्टीगेशन बाइक) दाखल.

सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक मा.मनोज पाटील यांचे संकल्पनेतून दि 11/02/2019 ते 13/02/2019 या कालावधी मध्ये सोलापूर ग्रामीण जिल्यातील पोलीस ठाणे मध्ये दाखल गुन्ह्यामध्ये पुरावे गोळा करणे तसेच गुन्ह्यातील दोषसिद्धी प्रमाण वाढविण्यासाठी तीन दिवसाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

सदर प्रशिक्षण मध्ये गुन्ह्याच्या ठिकाणचे फिंगरप्रिंट गोळा करणे,रक्ताचे नमुने गोळा करणे, फोटोग्राफ्स काढणे तसेच गोळा करण्यात आलेले पुरावे सीलबंद करणे त्याचे लेबलिंग करणे याचे प्रशिक्षण गुन्हे अन्वेषण विभागाचे छायाचित्रकार सुरेश रंगदल ,अंगुलीमुद्रा विभागाचे सपोनि राकेश माने व सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक जाधव तसेच फॉरेन्सिक मेडिसिन चे मार्गदर्शन डॉ राजेश कुमार औरंगाबाद फॉरेन्सिक कॉलेज यांनी वरील विषयाचे थिअरी व प्रकटिकलचे प्रशिक्षण दिले. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून केले जाणारे गुन्हे मध्ये हशव्हॅल्यू काढणे, डिजिटल पुरावा गोळा करून न्यालायत सादर करणे यासाठी जिल्हा सरकारी अभियोक्ता श्री राजपूत यांनी मार्गदर्शन केले तसेच सिंहगड कॉलेज चे प्राध्यापक दायमा व तारे यांनी हशव्हॅल्यू चे प्रशिक्षण दिले. या संपूर्ण प्रशिक्षण सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक

श्री मनोज पाटील यांचे मार्गदर्शन खाली उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर चंद्रकांत खांडवी यांनी आयोजित केले. पोलीस अधीक्षक मनोज पाटील यांनी हिरवा झेंडा दाखवून सोलापूर ग्रामीण पोलीस दलात १४ ibike व च्यासोबत ibike बॅग ,हेल्मेट देण्यात आलेल्या .सदर प्रशिक्षण ६३ पोलीस अधिकारी व कर्मचारी याना देण्यात आले आहे.या प्रशिक्षित ibike मुळे तपसीक अंमलदार याना गुन्ह्यात मोठी मदत होणार आहे तसेच चांगला पुरावा मिळाल्याने गुन्हे दोषसिद्धीचे प्रमाण वाढणार आहे.

.............००............

प्रति,

मा. संपादक,.....

२/— सदरची बातमी आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करणेस विनंती आहे.






i-Bike
MAHARASHTRA POLICE
i-BIKE
SOLAPUR (R)
महाराष्ट्र पोलीस